

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २४९०

युगानुयुगे ओली जखम
घेऊन तेलमागणाऱ्या
अश्वत्थामा
रानोमाळ भटकत
आहे.



कुणी म्हणतं —
अश्वत्थाम्याला
त्याचं अस्तित्व
आहे.
आमची जखम आम्हीच
सोसावी
तेल मागणंही व्यर्थ-
अश्वत्थाम्याला
हे कसं कळलं नाही!
प्लीज,
तो भेटला तर
सांगाना त्याला
अरे वेड्या,
तुझ्या माझ्या
दुःखासाठी
हे जग रडणार नाही
हे कसं तुला कळत नाही!



REFBK-0024085
REFBK-0024085

# उसासा

दत्ता वाघ

2850
28085
39192153

# उसासा

(काव्य–संग्रह)

दत्ता वाघ

REFBK-0024085
REFBK-0024085

चेतश्री प्रकाशन, अमळनेर

प्रकाशिका :
सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन
देशमुख चाळ, अंमळनेर

•

© सौ. आशा वाघ
शहादा ( जि. धुळे )

•

पहिली आवृत्ती : १९८३

•

किंमत : सात रुपये

•

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

•

मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ, पुणे.

( या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे )

घायाळ करणाऱ्या स्मृतींना . . . .

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९०
दा. क्र. २४०.८.५
काव्य ३१।१२।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

Oh, lift me as a wave, a leaf, a cloud !
I fall upon the thorns of life ! I bleed !

— Shelley

# कवितेच्या जगात मी नवखा...

खळखळत्या जीवनाचा हा वेडावाकडा प्रवाह !
या प्रवाहात नित्य नवी माणसं भेटली,
त्याबरोबर नव–नवे अनुभवही !
'जीवन आपल्याला कळलं' अशा दिमाखात असतानाच
तें केव्हा निसटलं याचा पत्ताच लागला नाही !
जीवनातील हे अनुभव शब्द–बद्ध करण्याचा
हा इवलासा प्रयत्न,
काहींनी माझं दुःख समजून घेतलं
काहींनी ..................
अशांची तमा बाळगण्याचं कारण नव्हतं.
मित्रांनी माझ्या कवितेवर प्रेम करण्यापेक्षा
माझ्यावरच जास्त प्रेम केलं.
मलेरियातील 'हवालदाराने' मात्र मला माणूस
म्हणून जगायला शिकवलं.
अनुभवावर आधारित साहित्याची लज्जतच काही
वेगळी असते.
मी दुःख खूप भोगलं– खूप जवळून पाहिलं.
असंही नाही.........
पण जे सामाजिक जीवन मी जगलो.
ज्या वेदना, ज्या जाणिवा मला झाल्या
ह्या सामाजिक वेदनेतून ही कविता जन्मली.
इथं निराशेचा सूरही असेल कदाचित,
पण ती निराशेतून नक्कीच जन्मली नाही.
सभोवतालच्या जीवनाचा तिच्यावर जबरदस्त
पगडा आहे हे मात्र खरं !
जे पाहिलं, जे अनुभवलं, जे भोगलं ते शब्दरूप झालं एवढंच !
या प्रवाहात अनेकांच्या मायेचे हात फिरले.

'कोसलाकार' भालचंद्र नेमाडे यांनी तर हा प्रवाह सुरू
ठेवण्यास भाग पाडलं. त्यांचं मार्गदर्शन सतत प्रेरणादायी ठरलं.
प्रा. विश्वास पाटील, प्रा. मधुकर काळे, प्रा. पां. या. जोशी,
उज्ज्वल कुळकर्णी यांनी तर हक्काने लिहायला लावलं
अगदी छबुकड्याला पाटी–पेन्सिल द्यावं तसं !
'स्वतंत्र भारत' च्या सदाशिवराव अण्णांनी या प्रवाहास
वेगवान चालना दिली.
आणि……
वारा तात्यांनी तर आपलंसंच केलं.

'कवितेच्या जगात मी नवखा'
यातनांचा सूर्य गिळताना
वेदना प्रसवतेच्या !
त्याही नवख्या…
तरीही सुखद हव्याहव्याशा !
हळूवार गोंजारताना–
स्पर्श कधी गुबगुबीत,
तर कधी रखरखीत
कवितेच्या जगात मी नवखा'

–दत्ता वाघ

---

## पूर्व प्रसिद्धी – आणि आभार


दिवाळी अंक– स्वतंत्र भारत, जनशक्ती, आपला महाराष्ट्र, जळगाव समाचार, चेतना (नियतकालिक) क्रांतिगंध, गावकरी.

साप्ताहिके– परी, स्वराज्य, गावकरी.

काही कविता जळगाव आकाशवाणीवरून प्रसारित–

# उ सा सा

## उसासा ....!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९०
अ. क्र. २४०८५
काव्य ३११२।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

धर्मशाळाच-
पण
उदध्वस्त.
कधीतरी
कुणासाठी
निवारा देणारी.

आता ओकी-बोकी
जागोजागी
भोकं पडलेली
नि:शब्द भयाण.

चिमण्यांची चिव-चिव
कबुतरांच गुटर्र .., र्र
एवढंच !

पूर्वी दूरचे पांथस्थ
थकलेले
विश्रांतीसाठी
थबकत.

आज केव्हातरी
चुकलेला
अजूनही
तोडक्या-मोडक्या

छताचा
आसरा घेत
विसावतो.

पण त्यातही
तिला
केवढं समाधान !
पूर्वी होतं
त्याहून कदाचित
जास्त.

आजही तेवढ्याच
प्रसन्न मुद्रेनं
थकल्या भागल्याचं
स्वागत
तेच तिच्यासाठी
अधिक मोलाचं !

अशीच एकदा
ती विलक्षण खिन्न
कुठंतरी प्रचंड
कोलाहल
तिचे ध्यानभंग.

भोकाभोकातून
अव्यक्त व्यथा
डोकावल्या.

या भग्न वास्तूच्या
पुनरूत्थानासाठी

कुठंतरी ‘ स्पीकर ’
ठणठणत होता
तिच्या हृदयात
सारखी कालवाकालव.

‘ अशी अनेक भाषणं ऐकली ’
एक असहाय दीर्घ उसासा.
अन् ती कोसळली
धाडकन् !

## वसंताची साद येता

गतकालाच्या स्मृती
मन एकत्र करते
अन्-
वसंताची साद येता
कोकिळेसारखं प्रतिसाद देणारं मन,
आनंदानं मोहरणारं हृदय
सारा आल्हाद
सारा उत्साह
लोप पावल्याची खंत देतें.
'एव्हरग्रीन श्रब' असं एकाकी
करपून का जावं ?
याहून दुसरी जीवलागण ती काय असणार ?
नुसत्याच पर्णहीन डहाळ्या
आ वासून आसमंताकडे बघताना
वाटतं यांच्याही पदरी
विधवेचं नैराश्य आलं असावं !

## क्रांती ?

क्रांती ! क्रांती !!
ओरडा जन्मभर
क्रांतीचं नाव घेऊन
अशांती वाढवा
क्रांतीसाठी मी नि तू
आपण सर्वंच–
शड्डू ठोकून बोम्बलू
बोम्बलून घशाला कोरड पडली की
वाऱ्याकडे तोंड करू.
मग नपूंसक दंड थोपटतील
तुम्ही आपण सारेच गंमत पाहू
त्यात लाज ती कसली
उद्या तुम्ही सांगावं की
वांझेला मूल जन्मलं !

# उद्ध्वस्त शहर

नभांनी झाकलेलं एक सुंदर शहर
शहरच होतं ते !
कसं शांत व निरव भासत होतं
एखाद्या अजाण-निरागस
बालकासारखं !
सभोवताली पर्वताच्या उंचच उंच रांगा
त्यावर पक्ष्यांच्या उडणाऱ्या झुंडी !
वाटलं मी पृथ्वीतलावरच ना ?
काय घडलं कोणास ठाऊक-
काळे काळे ढग
अचानक खवळले
वाटलं-
सारी सृष्टीच डगमगणार
प्रचंड आवाज होता तो.
काही कळण्याअगोदरच
एक शहर दिसलं
उद्ध्वस्त ! उद्ध्वस्त शहर !
वाटलं-
हेच का ते ' हिरोशिमा ! '

## मुक्तीसाठी

झपाटलेले मन
              डुबते कृष्णछायेत
वेडावलेले मन
              झोपते स्मृतीच्या मायेत
धडपडते
              स्थितीत हेळसांडलेल्या
मुक्तीसाठी फडफडते
              खगागत पिंजऱ्यातल्या

## उसवलेले शब्द

शब्दांची झालर विणायची
निळ्या गर्द आकाशाला
अजून द्यायची उंची–
एकएक शब्द विणला जात होता
विणताना शब्द शब्द उसवत होता
विणव-उसव चाललीच होती
उगीचंच वाटलं–
आपणसुद्धा 'पेनेलॉप' सारखंच
कुणाला प्रॉमिज तर
नाही ना केलं ?
छे ! हे होणं अशक्यच !
सारखे सारखे शब्द उसवत होते
सहजच वाटलं––
मनसुद्धा असंच उसवलं गेलं ! !

## थैमान

समोरच्या
कललेल्या
ताडाच्या झाडावर
रोज सकाळीं
एक सूर्यबिंब बसलेलं असतं
त्याला आवर्जून सांगावंसं वाटतं
तू असाच अचल रहा
कारण / लाखोंच्या हृदयात
धगधगत्या तेजस्वी
गोळ्याप्रमाणे
तू पेटलाहेस
लाखोंच्या पोटात
रक्ताच्या लालभडक
गोळ्याप्रमाणे
तू थैमान घातलं आहेस.

## तुला साद घालताना

तुला साद घालताना...
धुंद मैफिलीची वरात ये–जा करतेय
गीतांची बरसणारी अविरत बरसात
अजून बरसतेय
तो हर्ष-उन्माद
आता असणार असं वाटलंय ?
असून नसल्यासारखा.
एक मात्र खरं हं...
जिव्हारी बोचणारी दुःखाग्रं
त्या धुंद बरसातीत शांत होतात
त्या आकंठ नाहणाऱ्या स्मृती
विस्मृतीच्या गर्तेत झेप घेऊ बघतात.
दुनियेच्या राक्षसी मंचावर
स्मृतीसुद्धा तांडव–नृत्य करू पाहतात
...त्याही पदन्यासात !
हे असं अखंड चालणार...
संपणार कुठं ?
हे उमजलं असतं तर...
तुला साद घालताना
धुंद मैफिलींची वरात
ये–जा करणार होती ?

## बोल अंतरीचे

बोल अंतरीचे रडती ओरडती
नाते परी तयाशी कुणी न जोडती

अंतरीच्या व्यथा कुणा न कळती
मुग्ध भावना अंतरीच जळती

## भूवर भार

मन खिन्न करणारे
आयुष्य वैराण करणारे
क्षण अचानक घोडदौडीने यावेत
अन्
पेटलेले स्फुल्लिग शांत करणारे
ढगही अचानक बरसावेत
अनंत काळापासून.
घट्ट बांधलेले रेशमी बंध
असे तटातट का तुटावेत ?
वाटतं.
साराच भूवर भार
जनामनासाठी जगावं एवढंच !
आपलं जगणं खरं असतं
तर
आभाळ स्फुंदून स्फुंदून रडलं असतं !

## उद्ध्वस्त सूर्यास्त

सूर्याच्या लेकांनो
सूर्य कधी पाहिलाय ?
तळपता–तापता
रणरणता
प्रखरणारा
असा खरा सूर्य पाहिलाय ?
मी नाही पाहिला
पाहिलाय फक्त
एक उद्ध्वस्त सूर्यास्त !

# ‘ टु बी विदाऊट टीथ अ‍ॅण्ड क्लॉवज् ’

असंख्य मेण्ढरांसारखी
क्लासरूममधली शंभराचेही वर पोरं
चिव ... काव काव
कंट्रोल करणं जिवावरचं

पोरं नि ढोरं एकच
क्षणभर असं मानलं तरी
उद्याचे ते आधारस्तंभ !

चेकॉव्हची ‘ अ निनकाम्पूप ’ शिकविताना
How easy it is to crush
the weak in this world !
पक्कं स्मरणात !

म्हणून पोरं कावकावतात
त्याचाही आनंद.
टु बी विदाऊट टीथ अ‍ॅन्ड क्लॉवज्
जगण्यात काय अर्थ ?

# जिन्दाबाद–मुर्दाबाद

भणंग मस्तक
सुस्त शरीर
कुठं कुणाशी का करावी सलगी ?
काही समजत नाही,
जीवनाच्या तीरावर मार्ग नाही.
खरे जीवन कळले नाही
बरबटलेले डोळे
वखवखलेले पोट
कावळ्यांचा आक्रोश
कोल्हयांची कुई कुई
भल्याभल्यांचे नाऱ्यासाठी नारे
विरोधासाठी–विरोध
जिन्दाबाद–मुर्दाबाद
हाच जीवनाचा अर्थ ! (नव्हे स्वार्थ ! ! )
एवढयासाठीच जन्म आपुला.

## दोन कविता

१

तो सूर्य मला वाकुल्या दाखवतोय
कुणीतरी जाऊन सांगा हो त्याला
अरे, सारे आत्मे जळताहेत
सर्वत्र आक्रोश चाललाहे
अन् तू–
तू मात्र संतप्त आत्म्यांना
प्रक्षुब्ध मनांना
तळपवतोस !
वाटू दे थोडी नि
ओक भडाभडा...
जाळून टाक या दुनियेला

२

जग पेटताना मी पाहिलं
आकाश धरतीवर कोसळताना
सुद्धा पाहिलं
आत्मा जळताना
तुम्ही पाहिला का हो ?

## स्फुल्लिंग

दारिद्र्याच्या उंबरठ्यावर
हा अजून असाच
ताटकळत उभा आहे.
अन्न, वस्त्र नि निवारा
याची कधी त्याला
भासलीच नाही गरज !
युगानुयुगे पहातोय रस्ता
आज नाही तर उद्या-
केवळ याच आशेवर
मारतोय पिळा पोटाला
तारवटलेल्या बुबुळांनी पहातोय
ढेरपोट्यांचा तमाशा
यांना वेळ कुठाय-
गांडूळाची औलाद ना !
फिकीर त्यांनाच पडली
त्यांच्या भल्या मोठ्या वर्तुळास
जपायची
ब्लडप्रेशर वाढतंय...
पाण्यासारखा पैसा जातोय
(दमडीचा हिशेब याच्यासाठी नाही)
-केलंय मागच्या जन्मात पाप
भोगताहेत साले-
अरे पण ढेरपोट्यांनो
ह्या ढेरीवर बसेल ना लाथ

....२

धाय धाय बोम्बलाल
येईल नानी याद नि
म्हणाल वाचव रे नंदलाल
असंच होणार
एक दिवस असा येईल
सहनशीलतेच्या शृंखला
तटातट तुटतील
धुमसणारा अग्नी भडकेल,
सौजन्याची लक्ष्मणरेषा
क्षणात पुसली जाईल
विश्वासाचा आरसा तडकेल
दारिद्र्याचा ठसा मावळेल
नि धुम पळात...
धाय मोकलून बोम्बलाल

मराठी ग्रंथ संग्रहालय
२४९०
दा. क्र. २४०८
तारीख ३/१२
संग्रह शाखा (स्थ

# आमचा सूर्य

आमचा सूर्य नपुंसक
म्हणून आमच्या
झोपड्यात काळोख.
तुमचा सूर्य तेजःपुंज
म्हणून तुमची
झुंबरं लख्ख !
आमच्या सूर्यानं दिलंय काय ?
एकवेळचा तुकडा
द्यायलाही नाकबूल.
तुमचा सूर्य सगळं देतो
पोट फुटेपर्यंत
अगदी भुंकणाऱ्यांसाठीसुद्धा !
पण लाचार ते
आम्ही नाही
तुमचा सूर्य तेजःपुंज
आमचा नपुंसक
पण
आमचा शेवटी आमचाच
काळोखात चिमटा घेणारा
कधी कधी ढेकर देणारा
पुन्हा सकाळी
डोळे चोळत सुखावणारा

## रस्सीखेच

कितीदा बजावलं
कविता करताना अशी
समोर उभी राहू नकोस
… … … …
तुला पाहून
शब्दांची रस्सीखेच होते.

## आत्महत्या

कालपर्यन्त
सर्वांनाच मी आपलासा वाटत होतो
आज परका झालोय त्यांनाच-
केवळ या जाणिवेमुळे की काय
माझं जग पालटलं
भीषण-भयाण-विषण्ण
असंच काहीतरी.
सभोवतालचं सारं खायला उठतं.
मग समोर असतं
केवळ प्रश्नचिन्ह !
मी कोण ?
कशासाठी ?
का ?
वाटतं-
स्वतःला गळफास लावावा
भ्याडपणा करावा.
आत्महत्या !
अत्यंत चांगली कल्पना.
तिने केलीच की नाही.
असं लोक म्हणतात-
म्हणू दे.
मी नाही म्हणणार.
मी का म्हणू ?
माझ्या मते तिनं जे केलं
ते वेगळ्या शब्दात सांगायला हवं.

जो शब्द जगाला कळला नाही
कळत नाही नि कधी कळणारही नाही.
म्हणजे थोडक्यात–
तिनं केलाय तो ‘ त्याग ’ !
एखाद्यानं दुसऱ्यासाठी केलेला
तिनं माझ्यासाठी !
अर्थात तुम्हाला न पटणारं !
पण समजा–
मी जर आत्महत्या केली तर ?
त्याग–बलिदान असं कोणी म्हणेल ?
बरं कुठं पोकळी ...
काहीतरी उद्ध्वस्त वगैरे ?
पडकं–ओकं–बोकं
विश्व पालटेल वगैरे ?
कसं शक्य आहे.
ज्यानं कधी कुणासाठी काहीच केलं नाही
त्याच्यासाठी ह्या अपेक्षा मूर्खपणाच्या.
अहो मी मेलो तर....
दारावरचा हिरवा रावासुद्धा रडणार नाही हो.

# अश्वत्थामा

युगानुयुगे ओली जखम
घेऊन तेलमागण्या
अश्वत्थामा रानोमाळ
भटकत आहे.
कुणी म्हणतं-
अस्तंब्याला त्याचं
अस्तित्व आहे.
आमची जखम आम्हीच सोसावी
तेल मागणंही व्यर्थ-
अश्वत्थाम्याला हे कसं कळलं नाही !

प्लीज,
तो भेटला तर सांगा ना त्याला
अरे वेड्या,
तुझ्या माझ्या दुःखासाठी
हे जग रडणार नाही
हे कसं तुला कळत नाही !!

## बेबंद सूर्य

सूर्याची काय मजाल उगवेल तो सकाळी !
त्याची नि आमची झालीय कट्टी.
पळालाय तो शेपूट घालून !

लोकशाही वगैरे
थातूर मातूर
आमचा विश्वास--काळोख.

दाण्याची गरज नाही म्हणून
मागचा पावसाळा कोरडाच गेला.

घामाचं पाणी पोटभर प्यालो.
मागची थंडी जाणवलीच नाही.
उन्हाळ्यात राग अनावर झाला
बेबंद सूर्य पळालाय साला.

## ‘ आये तू रांडकी झालीस कधी ’

काळचा मायला सलाम करीत तो उभा.
दूर दूर क्षितिजापर्यंत हिरवं लुगडं पसरलेलं.
न राहवून तो बोलला–
गदगदला–
‘ आये तुझ्या उदरात स्वर्ग उतरला ’
काळचा धवळचाची म्हेनत सफल झाली.
यंदा सखूची कायजी मिटली.

शिवार सर्वे हिर्वे हिर्वे
कणसात दाणे टच्च भरे
गोफण सरासरा फिरे.
उद्या करू कापणी
म्हणून बेहोषित निजे.

कोवळचा उन्हात
तो बांधावर अचल
डोळ्यात अंधार
आणि तो हंबरला
‘ आये तू रांडकी झालीस कधी ! ’

# कुठेतरी दंगल झाली

कुठेतरी दंगल झाली
असे अचानक कानी आले
पोलिसांनी म्हणे खूप कंट्रोल केले
पण शेवटी
लाठी चार्ज करावाच लागला असे समजले.

दंगल तापल्याचे पुन्हा एकदा
कानी आले
पांढरा पांढरा धूर डोळ्यांत कसे पाणी आले.
शेवटी फायरचे छानसे बार
ऐकू आले
गोळीबार ! गोळीबार !!
कोणीतरी आकांताने ओरडले.

मी आपला धावत गेलो.
चला उद्याच्या पेपराला
एक खमंग मॅटर मिळाले.

## खुले आकाश मी आहे

बंदिस्त या जगातील
खुले आकाश मी आहे
लवले शिर कुणाचे
का कमरेची कमान आहे.

बडवीत छाती कोण आहे
पोर रडे धरतीवर
कां धरतीचा आक्रोश आहे
बंदिस्त या जगातील
खुले आकाश मी आहे.

## तिच्या खोल खोल डोळ्यांत

तिच्या खोल खोल डोळ्यांत
समुद्र बुडालेला
चेहऱ्यावरच्या भेगा निश्चलच जणू.
तिच्या पाठीमागे उभा सातपुडा
साम्राज्य हिर्वळीचं विखुरलेलं.

डोक्यावरच्या मोळीनं
ती बरीच वाकलेली,
कुबड निघाल्याचाच भास !

दर कोस दर मुक्काम करीत शहराला.
घामाच्या धारांनी चिंब !
चावडी चौकात कशीबशी मोळी टेकते.

गिऱ्हाइकांची घासाघीस.
–तिला दोन पैसे जास्त मिळालेच तर
पीठ–भाकर घेणार–
'अडीच' –पहिला
'पावणे तीन' –दुसरा.
'मी तीन देतो.' –मधूनच.

ती उभी
आकाशालाही बुडवत,
तिच्या रहाटगाडग्याचा लिलाव ऐकत.

## मृत्यूची कविता

थांब थोडा
उगीचच काय एवढी घाई.
इथं कुणा लेकाला जगायची हौस आहे.
पण थोडा थांब
एक ना एक दिवस तू भेटणार
म्हणजे आम्हाला राम द्यावा लागणार
असं अपेक्षित तर होतंच
पण तशी खात्रीही होती.

तू तसा बेईमानच
तरी तू मला प्रचंड आवडतोस.
जाम प्रेम करतोय तुझ्यावर.
भेदभाव-जातीयता इत्यादी न पाळणारा
तू असा एकटाच या जगात भेटलास.
आम्ही साले पिढ्या न् पिढ्या
त्यातच कुजतोय अजून.
बोम्बा मारता येतं आम्हाला पब्लिकली.
पण उमरट चढलो रे चढलो
पुन्हा म्हारासाठी वेगळी बशी,
भिल्लासाठी शेरात पाणी.
ही कावीळ आम्हाला जन्मापासून.
यात अनेक पिढ्या बरबाद झाल्या.
उभ्या आयुष्यात कधी तुझा
आदर्श गिरवला नाही

आदर्शाचे पाढे मात्र आमचे पाठ
अगदी एक दोन तीनसारखे
पण तुला सांगून काय उपयोग ?
अशी घाई करू नकोस.
अजून माझी दाढी उरकायचीय.
उगीचच माझ्या प्रस्थानानंतर
कुणाची चिकणी नको व्हायला
दहाव्याला केस कापणे.
अकराव्याला पितरं–
आणखी काही थातूरमातूर,
पण मी म्हणतो गरजच काय ?
हा नियम तूच तर घालून दिला नाहीस ना बाबा.
म्हंजे ह्या फ्याडांचे निर्माते आम्हीच !
नसती उठाठेव करायची खोड आम्हाला जन्मापासून
पण तुला हे सोपस्कार आवडतात कसे ?
हाऊ मिस्टिरिअस !
एकूण तूसुद्धा स्वार्थीच तर !
आम्हाला वाटलं हा गुण आमच्यातच असावा.
थांब–
अजून माझा पोर्शन अपूर्ण राहिलाय.
प्रिपेरेशन करायचं.
मग ते काय ठरवू.
नाही कसं ?
उद्या रिझल्ट बोम्बलला म्हंजे.
तू देशील उत्तर ?
आता कसं...
भागूबाई.

## स्वगत

' गर्द काळा पडदा '
' सर्वत्र किर्रर्र '

: करतोस काय येवढ्या भयाण राती ?
: दिसत नाय ? कबरी खोदतोय मुड्यांच्या.
उकरून काढतोय फटक्यात.
: सुशिक्षित बेकार की काय ?
: बेकारी गेलीय खड्डयात.
: मांत्रिक ?
: तो बी गेला चुलीत.
: मग ?
: खड्डयातल्या माणसांना जिवंत करतोय.
: खुळं ! येडं ! !
: नुसता सुन्न :
: आयला येडंबिडं काय ?
चाळवलंय काय ह्यानं ?
: सांगितलं ना.
खड्डयातल्या माणसांना जिवंत करतोय
कीड लागलेल्या संस्कृतीला नवजीवन देतोय.
: बावळट. खुळचट.
: ................ :
: आरं अय ! बंद कर. मुडदे कदी जिवंत जालीय ?
: मग तू काय हायीस ?
: म्हंजे मी मुडदा ?

: हचॅ ऽ हचॅ ऽऽ हचॅ ऽऽऽ :
बंद कर हसणं. अस्मानाला वेसण
घालाया निघाला.
: आरे संस्कृती जपतोय ... संस्कृती.
: संस्कृती रक्षणकर्ता का ?
: त्यांच्यासाठीच मुडदे उकरतोय.
कीड लागलेल्या संस्कृतीला जागं करतोय.
कबरी खोदतोय .... कबरी.
: नुसतं हसणं : : पुन्हा हसणं :

REFBK-0024085
REFBK-0024085

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८०५
दा. क्र. २४०८५
काव्य ३१/१२/८३
संग्रह शाखा (स्थळ प्रत)



दत्ता बाघ